# हृदयीच्या गोष्टी

**डॉ. विजया वाड**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**हृदयीच्या गोष्टी**
डॉ. विजया वाड

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
डॉ. विजया वाड
६/६६, प्रिन्स्टन बिल्डिंग, मेन स्ट्रीट,
हिरानंदानी गार्डन्स्, पवई, मुंबई- ४०० ०७६
दूरध्वनी : २५७० ४७५९

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ १८०/-

**अर्पण पत्रिका**

श्री. राधाकृष्ण नार्वेकर व सौ. शमा नार्वेकर
या प्रेमळ सहृदय दांपत्यास ही कलाकृती अर्पण.

आपलीच,
**– डॉ. विजयाताई वाड**

## आभार

नवशक्ति, पुण्यनगरी परिवार
आणि दिवाळी अंकांचे संपादक
अभिजीत वैद्य
विश्वनाथ खांदारे
सर्व वितरक
अमृता आणि श्रेयस आठवले

## हृदयसंवाद

मनातला उचंबळ जेव्हा कागदावर उतरतो तेव्हा तो
एका हृदयापासून अनेक हृदये काबीज करतो;
नि त्यांच्यावर राज्य करतो. माझ्या प्रिय वाचकांनो,
हे जीवन सुंदर आहे. सुखाला जेव्हा दुःखसुद्धा
अलगद कुशीत घेता येतं ना. त्याला कुरवाळून
समजावता येतं ना... तेव्हा संकटावर मात
करायचं धैर्य आपोआप प्राप्त होतं. आपणास
सर्वांशी कथांद्वारे साधलेला हा हृदयसंवाद
आपल्या आयुष्यात चार आनंदाचे, सुखाचे क्षण
घेऊन येवो, हीच इच्छा, खूप प्रेम व शुभेच्छा.

आपलीच,

**– डॉ. विजयाताई वाड**

## लेखिका डॉ. विजया वाड यांचा अल्पपरिचय

विजयाताईंची सकारात्मक लेखणी आयुष्यभर मुलींचे आत्मभान जागृत व्हावे म्हणून वापरली गेली आहे. दरवर्षी एक हजार आदिवासी मुलींना दत्तक पालक मिळवून देण्यासाठी त्या प्रयत्नशील असतात. सांताक्रुझ (प.), मुंबई येथील राजा रामदेव पोदार शाळा व ज्युनिअर कॉलेजच्या त्या प्राचार्य होत्या. तत्पूर्वी उदयाचल हायस्कूल गोदरेज येथे त्या मराठी माध्यमाच्या प्रमुख म्हणून काम करीत होत्या आणि तेथेच ''स्वच्छ सुंदर हिरवे विक्रोळी स्टेशन '' हा पर्यावरण प्रकल्प त्यांनी केला. ५०० विद्यार्थी आणि ११ शिक्षक त्यात सहभागी झाले. या प्रकल्पाला ५० हजार रुपयांचे पहिले 'कॅथे पॅसिफिक एन्व्हायरनमेंट ॲवार्ड' १९९५ या वर्षात उदयाचलास मिळवून दिले व दोन विद्यार्थी 'लापलाला' येथे जाऊ शकले. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळाच्या त्या पहिल्या महिला अध्यक्ष आहेत. त्यांची एकूण १०० पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'टिंकू टिंकल' आणि 'बंडू बॉक्सर' या दोन बालकादंबऱ्यांना राज्य पुरस्कार तर 'अवेळ' या कथासंग्रहास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांच्या 'देवऋषी' या कवितेस पर्यावरण मंत्रालयाचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. महानगर टेलिफोन निगमतर्फे त्यांचा पहिल्या 'ममता' पुरस्काराने गौरव केला गेला आहे. शिक्षणक्षेत्रातील मानाचा 'जिजामाता पुरस्कार'ही त्यांना मिळाला आहे. वेगवेगळ्या ३५ पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले असून त्या टाटा मेमोरिअल शिष्यवृत्तीच्या मानकरी आहेत. त्यांचे शिक्षण बी.एस्सी., बी.एड., एम.ए., पीएच.डी. इतके झाले असून बी.एड. व एम.ए.ला त्यांना विद्यापीठात मानांकन होते. मुंबई दूरदर्शनच्या 'शालेय चित्रवाणी' या कार्यक्रमात टीव्ही टीचर म्हणून त्यांनी अकरा वर्षे सातत्याने (१९७४ ते ८५) काम केले असून 'परागण' हा मुंबई दूरदर्शनवरील पहिला पाठ घेण्याचा मान त्यांना मिळाला. विश्वकोशाच्या ग्रंथवाचन स्पर्धांच्या आगळ्यावेगळ्या कामगिरीबद्दल त्यांना २००८ मध्ये कोलंबो विद्यापीठाने डी.लिट्. ही सन्माननीय पदवी प्रदान केली. के.जे. सोमैया कॉलेज

आणि एस.टी. कॉलेज. मुंबई येथे शिकत असताना त्यांनी सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनीचा किताब पटकावला होता, तर पीएच.डी.चे सुवर्णपदक बॉम्बे टीचर्स ट्रेनिंग कॉलेजने दिले होते. विश्वकोशाचे खंड १७, १८ आणि १९ व २० या चार ग्रंथांचे संपादन त्यांनी अल्प कालावधीत केले; शिवाय २०, १७८ पानांची सीडी करून विश्वकोशाचे सारे एक ते सतरा खंड एकत्रित स्वरूपात जनतेस अर्पण केले. विश्वकोश १ ते २० खंड marathivishwakosh.in वर सीडॅकच्या मदतीने टाकून त्यांनी मराठी विश्वकोश जगास खुला केला. विश्वकोशाच्या या वेबसाईटला महाराष्ट्र शासनाचा ई गव्हर्नन्स प्लॅटिनम पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्याला १०५ देश नि १५ लाख वाचक मिळाले. तसेच विजयाताईंची संकल्पना असलेली विश्वकोशाची 'महाराष्ट्रकन्या' ही महाराष्ट्रातील २७५ तेजस्विनींची चरित्रे सांगणारी २२ तासांची ध्वनिफीत महाराष्ट्रात भारत सरकारने दुर्गम भागांपर्यंत पोहोचविली आहे. विजयाताईंनी अंधांसाठी बोलका विश्वकोश तयार केला. इ.स. २००७ ते २००९ या काळात त्यांनी अ. भा. बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. या काळात 'पारावरल्या बालगप्पा' जोडाक्षरविरहित सात पुस्तकांचे संपादन, ११ अध्यक्षीय भाषणे या ग्रंथाचे संपादन, संस्थेची वेबसाईट आणि जमाराशीत वाढ अशी भरीव कामगिरी त्यांनी केली. मातामेळावे, बालकपालक, समुपदेशन, यशाचे रहस्य या विषयांवर भारतासह अन्य १४ देशांत त्यांनी व्याख्याने दिली आहेत. त्यांना डॉ. प्राजक्ता (जी सर्जन आहे) आणि डॉ. निशिगंधा (जी अभिनेत्री व पीएच.डी. स्कॉलर आहे) अशा दोन गुणी कन्यका आहेत. त्यांचे पती डॉ. विजय वाड, भारत-पाक युद्ध लढले असून रक्षा मेडलचे मानकरी आहेत.

✦✦✦

# एक आवाहन

प्रिय वाचकहो,

'चैतन्याचे स्रोत' या माझ्या 'तिसरी घंटा' या पुस्तकातील लेखाने ५०० आदिवासी मुलींना दत्तकपालक मिळाले. मी माझे प्रकाशकमित्र दिलीप काळे व माझे वाचक यांची ऋणी आहे. 'बांधिलकी' ही संस्था माझी ज्येष्ठ मैत्रीण स्मिता जोशी यांनी कोंडिवडा (ता. कर्जत, जि. रायगड) येथे सुरू केली. मी त्यांना फंड मिळवण्यास मदत करते. त्यातून आदिवासी मुली शिकतात. दत्तक घ्यायचे म्हणजे काय? तर तिच्या शिक्षणाचा खर्च वर्षभरासाठी करायचा. बस! कसा? क्रॉस चेक रु. ५००/- (एका मुलीसाठी) बांधिलकी (Bandhilki) या नावाने माझ्या पत्त्यावर पाठवायचा. धनादेशामागे आपले संपूर्ण नाव, पत्ता फोन नंबर द्यायचा. म्हणजे पावती येईल. कोंडिवडा ते राजमाची २२०० आदिवासी पोरी तुमच्या-आमच्या मदतीवर शिकतायत. स्वयंसिद्ध होतायत. आपल्याला वाटते ना मदत करावीशी? मी वाट बघतेय.

आपली,

- विजूताई